चिपळूण, जि.रत्नागिरी येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्याबाबत व त्याकरीता आवश्यक पदे निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१८/७४२/प्र.क्र.१३४/कार्या-११

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दि. २३ जुलै, २०१९.

<u>वाचा</u>:- १) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. No: B(W)A-१२०३/२००८/१४७२/२४९३६, दि.१२.०७.२०१८.

२) जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचे म.जा.क्र.प्रशा.ब-४/३१२५/२०१८, दि.३०.०६.२०१८.

३) जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचे म.जा.क्र.प्रशा.ब.४/४०८९/२०१८, दि.२४.०८.२०१८.

४) जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचे म.जा.क्र.प्रशा.ब.४/२९७४/२०१९, दि.३१.०५.२०१९.

५) वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे क्र.पदनि-२०१९/प्र.क्र.२२/आपुक, दि.०८.०३.२०१९ रोजीचे पत्र). (पदनिर्मितीबाबत कार्यवृत्त)

६) वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे क्र.पदनि-२०१९/प्र.क्र.३६/१९/आपुक, दि.१६.०५.२०१९ रोजीचे पत्र). (पदनिर्मितीबाबत कार्यवृत्त)

<u>प्रस्तावना:-</u>

राज्यातील विविध ठिकाणी न्यायालय सुरु करण्यासाठी प्रलंबित खटले / प्रकरणांची संख्या किमान ५०० असावी. त्याचबरोबर पायाभूत सुविधा उदा. न्यायालयीन इमारत आणि न्यायाधीशांची निवासस्थाने यांची उपलब्धता असावी, या मा.उच्च न्यायालयाच्या धोरणानुसार आवश्यक सर्व निकष पूर्ण होत असल्याने चिपळूण, जि.रत्नागिरी येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास मा.उच्च न्यायालयाच्या न्यायालय स्थापना समितीने मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर न्यायालय स्थापनेस व त्यानुषंगाने आवश्यक असणाऱ्या २५ पदांच्या निर्मितीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

चिपळूण व गुहागर, जि.रत्नागिरी या तालुक्यांकरीता चिपळूण, जि.रत्नागिरी येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास व त्याकरीता पुढील विवरणपत्रात दर्शविल्यानुसार २५ पदे (२३ नियमित व २ बाहययंत्रणेची पदे) न्यायालय सुरु होण्याच्या दिनांकापासून निर्माण करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

चिपळूण, जि.रत्नागिरी येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेली पदे (अस्थायी)

अ.क्र.	पद	वेतनश्रेणी	वित्त विभागाने मान्य केलेली पदे
१	अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश	५१५५०-१२३०-५८९३०-१३८०-६३०७०	१
२	अधीक्षक	एस-१६- ४४९००-१४२४००/-	१
३	इंग्रजी लघुलेखक (उ.श्रे.)	एस-१५-४१८००-१३२३००/-	१
४	वरिष्ठ लिपिक	एस ८-२५५००-८११००/-	४
५	कनिष्ठ लिपिक	एस-६-१९९००-६३२००/-	९
६	बेलिफ	एस-६-१९९००-६३२००/-	३
७	वाहनचालक	एस-६-१९९००-६३२००/-	१
८	शिपाई	एस-१-१५०००-४७६००/-	२
९	पुस्तक बांधणीकार	एस-५-१८०००-५६९००/-	१
१०	पहारेकरी	मानधन	१ बाहययंत्रणेद्वारे
११	सफाई कामगार	मानधन	१ बाहययंत्रणेद्वारे

२. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.जे-१,२०१४, न्यायदान, १०५ दिवाणी व सत्र न्यायालये,(०२) जिल्हा व सत्र न्यायाधीश,(०२)(०१)जिल्हा व सत्र न्यायाधीश (२०१४ ०१७२) (अनिवार्य) या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. या अनुषंगाने निधी उपलब्धतेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने अनौपचारिक संदर्भ क्र.०६/१९/व्यय-५, दि.०१.०१.२०१९ व अनौपचारिक संदर्भ क्र.६५८/आपुक,दि.०३.१२.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७२५१२०७५७३९१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Amogh Shyamkant Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2019.07.25 12:19:15 +05'30'

(अ.श्या.कलोती)

विधि सल्लागार-नि-सह सचिव

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा.विरोधीपक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद.

४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानमंडळ, मुंबई.

५) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.

६) मा.राज्यमंत्री, विधि व न्याय विभाग, यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.

७) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन यांचे स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.

८) महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)

९) प्रबंधक (निरीक्षणे-१), उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)

१०) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी,

११) जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, चिपळूण, जि.रत्नागिरी.

१२) महालेखापाल (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता)महाराष्ट्र-१,मुंबई.

१३) जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी.

१४) वित्त विभाग, कार्यासन- व्यय ५ व आ.पु.क.,मंत्रालय, मुंबई.

१५) विधि व न्याय विभाग, १२,१३,२३ व २४, मंत्रालय, मुंबई.

१६) निवडनस्ती.